मिळकत कराच्या फरकाची रक्कम भरण्याला तूर्त स्थगिती

अतिरिक्त आयुक्तांची स्पष्टोक्ती

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : मिळकत कराच्या फरकाची रक्कम भरण्याच्या निर्णयाला महापालिका प्रशासनाने तूर्त स्थगिती दिल्याचे अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी बुधवारी स्पष्ट केले. नियमित देयकांव्यतिरिक्त फरकाच्या वाढीव देयकांबाबत पुढील निर्णय होईपर्यंत नागरिकांनी रक्कम भरू नये, असा निर्णय महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांच्या मान्यतेने घेण्यात आला. त्यामुळे पुणेकरांना दिलासा मिळाला आहे.

लाखो नागरिकांनी पुणेकरांनी वेळेवर मिळकतकर भरला, तरी अचानक थकीत मिळकतकर भरण्याबाबत ई-मेल किंवा मेसेज पाठविण्यात येत आहेत. दरवर्षी कर भरूनही पाच ते वीस हजारांपर्यंतच्या थकबाकीचा उल्लेख ई-मेल, मेसेजमध्ये असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. दुसरीकडे महापालिका वर्षानुवर्षे देत असलेली ४० टक्के सवलत ऑगस्ट २०१९ पासून राज्य शासनाने रद्द केल्याने फरकाची ही रक्कम नागरिकांना भरावीच लागणार असल्याची भूमिका प्रशासनाने घेतली होती. महापालिकेने केलेल्या मिळकतींच्या सर्वेक्षणानुसार नागरिकांना ४० टक्के सवलत रद्द केल्याच्या नोटिसा पाठवल्या जात आहेत. शासनाच्या १७ सप्टेंबर २०२१ च्या आदेशानुसार करदात्यांकडून १ ऑगस्ट २०१९ पासून पुढे ४० टक्के सवलतीची रक्कम वसूल केली जात आहे. ३१ मार्चपर्यंत कोणत्याही शास्तीशिवाय (दंड) नागरिकांना ही रक्कम भरता येईल, असे महापालिकेकडून सांगण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर बुधवारी तूर्त वाढीव देयकांची रक्कम नागरिकांनी भरू नये, असा निर्णय घेण्यात आला.

महापालिकेकडून आलेले ई-मेल, मेसेज चुकून आलेले आहेत. याबाबत सविस्तर शुद्धीपत्रक प्रसिद्ध केले जाईल, असे महापालिका आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी मंगळवारी स्पष्ट केले होते. त्यानुसार बुधवारी अतिरिक्त आयुक्त डॉ. खेमनार यांनी नियमित मिळकत कराव्यतिरिक्त पाठविण्यात आलेल्या फरकाच्या देयकांबाबत पुढील निर्णय होईपर्यंत नागरिकांनी कार्यवाही करू नये, असे आवाहन केले.

नेमके प्रकरण काय?

पुणे महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने सोमवारी हजारो नागरिकांना मिळकतकर थकबाकी भरण्याबाबतचे एसएमएस किंवा ई मेल पाठवले. महापालिकेकडून सन १९७० पासून घरमालक स्वतः राहत असलेल्या घरासाठी वार्षिक भाडे ६० टक्के धरून मिळकत करात ४० टक्के सवलत दिली जात होती. मात्र, महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने मिळकतकरात दिली जाणारी ४० टक्के सवलत रद्द करण्याचा आदेश राज्य शासनाने दिला होता. त्यानुसार ही सवलत रद्द करण्यात आली. मात्र, नागरिकांच्या मागणीनुसार महापालिकेच्या शेवटच्या सर्वसाधारण सभेत ही सवलत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला गेला. यानंतर हा निर्णय मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे करआकारणी व करसंकलन विभागाने पूर्वीच्या आदेशानुसार दिली गेलेली ४० टक्के सवलतीची रक्कम आकारण्यास सुरुवात केली आहे. परिणामी, नागरिकांना थकबाकीची बिले पाठविण्यात आली.

जिल्ह्यात २९४ जणांना नव्याने संसर्ग

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : बुधवारी दिवसभरात जिल्ह्यातील २९४ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

बुधवारी दिवसभरात आढळलेल्या २९४ नवीन रुग्णांपैकी १६८ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. ७१ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर ५५ रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषतः जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बुधवारी आढळलेल्या २९४ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १४ लाख ९४ हजार ६७७ एवढी झाली आहे. जिल्ह्यातील १७७९ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

एमपीएससी परीक्षेसाठी पुणे जिल्हा केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त अर्ज

पुण्याबाहेरील उमेदवारांना त्यांच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश, एमपीएससीचा निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२२साठी पुणे जिल्हा केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त अर्ज आले आहेत. त्यामुळे पुणे जिल्हा केंद्र निवडलेल्या उमेदवारांपैकी पुणे जिल्ह्याच्या बाहेरील जिल्हा किंवा शहरांतील कायमस्वरूपी रहिवासाचा पत्ता नमूद केलेल्या उमेदवारांना त्यांच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) घेतला आहे.

एमपीएससीने प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे ८ ऑक्टोबरला महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२२ आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील ३७ जिल्हा केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. परीक्षेच्या जाहिरातीला अनुसरून अर्ज करताना उमेदवारांनी त्यांच्या पसंतीचे जिल्हा केंद्र निवडले असले, तरी पुणे जिल्हा केंद्रावर क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात उमेदवारांचे अर्ज आले. त्यामुळे परीक्षेचे आयोजन सुरळीत होण्यासाठी पुणे जिल्हा केंद्र निवडलेल्या उमेदवारांपैकी पुणे जिल्ह्याच्या बाहेरील जिल्हा किंवा शहरांतील कायमस्वरूपी रहिवासाचा पत्ता नमूद केलेल्या उमेदवारांना त्यांच्या जिल्हा केंद्रावर प्रवेश देण्यात येणार आहे, असे एमपीएससीने नमूद केले. तर या व्यवस्थेप्रमाणे प्रवेश देण्यात आलेले जिल्हा केंद्र बदलण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव आणि कोणत्याही सबबीखाली मान्यता करता येणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

पदवी प्रथम वर्ष प्रवेशांबाबत बीएमसीसीला नोटिस

महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाला (बीएमसीसी) प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उच्च शिक्षण सहसंचालकांनी नोटिस बजावली आहे. त्यामुळे महाविद्यालयाने राबवलेल्या प्रवेश प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

स्वायत्त असलेल्या बीएमसीसीकडून प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवताना सामायिक प्रवेश परीक्षेबरोबरच दहावीच्या गुणांना महत्त्व देण्यात आले. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेत नियमांचे पालन न झाल्याचा आक्षेप घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेश खुरपे, अखिल भारतीय सेनेचे उल्हास अग्निहोत्री, वंचित बहुजन आघाडीचे अतुल झोडगे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अमरजित पबमे आदींनी विद्यापीठाकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर विद्यापीठाकडून खुलासा मागवण्यात आला होता. तसेच या प्रवेश प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयाच्या मागणीनुसार दहा टक्के वाढीव जागांना विद्यापीठाकडून नकार देण्यात आला.

या पूर्वीच्या पत्रानुसार प्रवेश प्रक्रिया राबवली नसल्यास सदर विद्यार्थ्यांची पात्रता ग्राह्य धरता येणार नाही असे विद्यापीठाने महाविद्यालयाला पाठवलेल्या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे. तर विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना, शासनाचे स्वायत्त महाविद्यालयांतील एकरूप परिनियम प्रवेश प्रक्रियेचे निकष या बाबी नमूद करून आपले म्हणणे आठ दिवसांत संचालनालयाला सादर करण्याबाबत उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, विद्यापीठ आणि उच्च शिक्षण सहसंचालक यांच्याकडे प्रवेश प्रक्रियेबाबतची बाजू मांडत असल्याचे महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा पुरोहित यांनी सांगितले.

प्रधानमास्तरांची दोन पुस्तके नव्याने वाचकांच्या भेटीला

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : ज्येष्ठ समाजवादी विचारवंत-लेखक आणि 'साधना'चे माजी संपादक प्रा. ग. प्र. प्रधान यांची 'टॉलस्टॉयला पत्र' आणि 'डॉ. आंबेडकर त्यांच्याच शब्दांत' ही दोन पुस्तके नव्याने वाचकांच्या भेटीला येत आहेत.



आयुष्याच्या उत्तरार्धात प्रधान सरांनी लिहिलेली ही दोन्ही पुस्तके आता उपलब्ध नाहीत. प्रधान सरांच्या जन्मशताब्दी समारोपानिमित्त शुक्रवारी (२६ ऑगस्ट) होणाऱ्या कार्यक्रमात या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे, अशी माहिती साधनाचे संपादक विनोद शिरसाठ यांनी दिली.

शिरसाठ म्हणाले, इंग्रजी साहित्य विषय घेऊन एम. ए. करत असताना प्रधान यांचा टॉलस्टॉय यांच्या साहित्याशी संबंध आला. अखेरच्या काळात प्रधान यांनी टॉलस्टॉय यांचे साहित्य पुन्हा वाचून काढले आणि त्यातून 'टॉलस्टॉयला पत्र' हे पुस्तक साकारले गेले. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र वाचून प्रधान यांनी 'डॉ. आंबेडकर त्यांच्याच शब्दांत' हे पुस्तक मुलाखतीच्या आकृतिबंधामध्ये लिहिले होते.

जन्मशताब्दी सांगतेचा शुक्रवारी कार्यक्रम

महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, साधना साप्ताहिक आणि साहित्य शिवार दिवाळी अंक यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (२६ ऑगस्ट) एस. एम. जोशी सभागृह येथे सायंकाळी साडेपाच वाजता प्रा. ग. प्र. प्रधान जन्मशताब्दी सांगता समारंभ आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव, सिम्बायोसिस विद्यापीठाचे कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि साधनाचे संपादक विनोद शिरसाठ या वेळी उपस्थित राहणार आहेत.

बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961

नोंदणीकृत कार्यालयः आकुर्डी, पुणे -४११०३५

कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

मुदत ठेव योजना

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग

या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (२६ ऑगस्ट २०२२ पासून लागू) वैध आहे. अनिवासी भारतीयांसाठी, OCI साठी व PIO साठी

नवीन ग्राहकांसाठी:

तख्ता १					
कालावधी (तख्ता २ व्यतिरिक्त)	संचयी	बिगर- संचयी			
	मुदत पुर्तीला	मासिक	त्रैमासिक	सहामाही	वार्षिक
१२ - २३ महिने	६.३५%	६.१७%	६.२०%	६.२५%	६.३५%
२४ - ३५ महिने	६.९५%	६.७४%	६.७८%	६.८३%	६.९५%
३६ महिने	७.४०%	७.१६%	७.२०%	७.२७%	७.४०%

तख्ता २					
कालावधी	संचयी	बिगर- संचयी			
	मुदत पुर्तीला	मासिक	त्रैमासिक	सहामाही	वार्षिक
१५ महिने	६.५५%	६.३६%	६.४०%	६.४५%	६.५५%
१८ महिने	६.६५%	६.४६%	६.४९%	६.५४%	६.६५%
२२ महिने	६.८०%	६.६०%	६.६३%	६.६९%	६.८०%
३० महिने	७.०५%	६.८३%	६.८७%	६.९३%	७.०५%
३३ महिने	७.१५%	६.९३%	६.९७%	७.०३%	७.१५%

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहिल.

ख)ड(२) मध्ये दिलेल्या गावांमधून आलेल्या ठेवींसाठी किमान आकार ₹५०००/- आहे. (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)

ग) केवळ एनआरओ (अ-निवासी बँक) खात्यांमधूनच ठेवीचा निधी स्वीकारार्ह असेल. ठेवीची रक्कम ही NRE / FCNR (B) खात्यातून वळती केलेली नसावी.

घ) जेष्ठ नागरिक जर प्रथम अर्जदार असेल तर (म्हणजे, वय वर्षे ६० हुन जास्त असलेल्या व्यक्ती, वयाच्या पुराव्याच्या तरतुदी अधीन): ₹५ (पाच) कोटीपर्यंतच्या प्रत्येक ठेव रकमेवर दर साल ०.२५% या दराने अतिरिक्त व्याज दिले जाईल.

ड) ₹५ कोटीहून जास्त रकमेच्या बल्क ठेवींवरील व्याजदर हा, प्रत्येक ठेवीनुसार, प्रसिद्ध केलेल्या कार्डावरील दरापेक्षा वेगळा असू शकतो आणि त्या त्या केसच्या आधारावर तो ठरवला जाईल पण असा वेगळा दर हा रिझर्व बँकेने निश्चित केलेल्या व्याजदराच्या मर्यादेतीलच असेल.

च) मुदत-पूर्तीच्या (मॅच्युरिटी) दिनांकापूर्वी ठरलेल्या विहित कालावधीत नूतनीकरणाची कोणतीही विनंती कंपनीला प्राप्त झालेली नसल्यास, कंपनीकडून मुदत-पूर्तीच्या दिनांकाला ठेव परत केली जाईल. एनईएफटी किंवा आरटीजीएस आणि / किंवा धनादेशाद्वारे (जर एनईएफटी/आरटीजीएस द्वारे हस्तांतरण नाकारले गेल्यास) ठेव अर्जात नमूद केलेल्या ठेवीदाराच्या बँक खात्यात देय दिले जाईल.

छ) ठेवीच्या (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाच्या) नूतनीकरणासाठीची विनंती प्रत्यक्षतः, मुदत-पूर्तीच्या दिनांकापूर्वी २४ तास आधी करता येऊ शकेल, त्यासाठी सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांद्वारे लेखी विनंती देता येऊ शकेल, त्याप्रमाणे कंपनीला ठेव-परती किंवा ठेवीचे (किंवा त्यातील एखाद्या हिश्शाचे) नूतनीकरण ठरलेल्या देय दिनांकाला करता येईल. उपरोक्त उल्लेखित कालावधीच्या आधी ठेवीच्या नूतनीकरणाची विनंती ठेवीदाराने सादर करावयाची आहे. नूतनीकरणाच्या विनंतीसोबत सर्व ठेवीदारांनी विहित अर्जाचा नमुना यथायोग्य भरून व सह्या करून द्यावयाचा आहे. नूतनीकरण हे, ठेवीच्या नूतनीकरणाच्या दिवशी प्रचलित असणारे व्याजदर आणि इतर अटी व शर्ती यांच्या अधीन राहिल. विद्यमान ठेवीच्या मुदत-पूर्तीच्या दिवसानंतर एफडीआर हे रद्दबातल आणि अवैध ठरत असल्याने ठेवीच्या नूतनीकरणाच्या वेळी त्याची आवश्यकता असलेच असे नाही.

ज) जर ग्राहकाने अजाट्टिरे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी ३ दिवस आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरुस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

क. कंपनीचे नावः बजाज फायनान्स लि.

ख. गठित केले गेल्याचा दिनांकः 25 मार्च, 1987

ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:

वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

आर्थिक वर्ष रोजी संपले	नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व	कर-पश्चात	लाभांश %
३१.०३.२०२०	६,८०८.१३	४,८८१.१२	५००
३१.०३.२०२१	५,३६२.८८	३९५५.५१	५००
३१.०३.२०२२	८,५९६.३९	६,३५०.४९	१०००

घ. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशीलः

संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकांना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसायः

नाव	पत्ता	व्यवसाय
श्री. संजीव बजाज (अध्यक्ष)	बजाज विहार कॉलनी, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५.	उद्योगपती
श्री. राजीव जैन, (व्यवस्थापकीय संचालक)	डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे - ४११०१४.	नोकरी
श्री. राजीव बजाज (संचालक)	३४/३५, योग कोरेगाव पार्क, लेम क्र. २, पुणे - ४११०३५.	उद्योगपती
श्री. डी जे बालाजी राव (स्वतंत्र संचालक)	डी-१०३, आदर्श रेसिडेन्सी, ४७ वा क्रॉस, ८ वा ब्लॉक, जयानगर, बंगलोर - ५६००८२	व्यावसायिक
डॉ नौशाद फोर्ब्स (स्वतंत्र संचालक)	७४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे - ४११ ००१.	व्यवसाय
श्री अनामी नारायण राव (स्वतंत्र संचालक)	६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, मुंबई -४०० ०३०.	सेवानिवृत्त सनदी सेवक
श्री प्रमीत झवेरी (स्वतंत्र संचालक)	२१ सी, वूडलँड्स, पेडर रोड, मुंबई - ४०० ०२६.	व्यवसाय
श्रीमती राधिका हरिभक्ती (स्वतंत्र संचालक)	५१, मेकर टॉवर बी, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.	आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक

छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०१६ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मानाने उभी करू शकणारी रक्कम आहे: ५७,८५६.३२ कोटी

ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२२ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : ३०,२८९.५२ कोटी

ज. ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही ११४.३१ कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लिमिटेड - ०.०८ कोटी, बजाज फायनान्शिय सिक्युरिटीज लिमिटेड - ५०.२१ कोटी, बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - २.७१ कोटी, बजाज आलियान्झ जेनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - ४८.५५ कोटी, बजाज फिन्सर्व हेल्थ लिमिटेड - १२.३० कोटी, बजाज ऑटो लिमिटेड - ०.२१ कोटी, हिंदु मुसाफिर एजन्सी लिमिटेड - ०.०१ कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड - ०.०२ कोटी, जमनालाल सन्स प्रायव्हेट लिमिटेड - ०.२२ कोटी).

झ. ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

ञ. कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः

i) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.

ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही

iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.

iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.

v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी रिजर्व बँक ऑफ इंडिया घेत नाही.

ट. ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

ठ. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मूल्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल

क) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांपर्यंतः काढण्याची परवानगी नाही

ख) ३ महिन्यांनंतर पण ६ महिन्यांच्या आतः व्याज देय असणार नाही.

ग) ६ महिन्यांनंतर पण अंतिम मुदतीच्या दिनांकाआधीः ही योजना चालवली जात आहे त्या कालावधीदरम्यान निश्चित केल्या गेलेल्या व्याजदरापेक्षा २% व्याजदर कमी राहिल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निश्चित केला गेला नसल्याच्या प्रकरणी बीएफएल द्वारे देऊ केल्या गेलेल्या सर्वाधिक कमी दरापेक्षा ३% कमी व्याजदर देय राहिल.

ड. असल्यास, शाखांच्या किंवा एकांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः

ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेतः आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहरादून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खागमाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरूक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पॉंडिचेरी, पुणे, पुलूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ही, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.

२. किमान ठेव रक्कम रु.५०००/- असलेल्या जागाः (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)

अ) गुजरात - बुजेठा, काहांवा, खापरवाडा, नांदरखा, सुनेवकाला, अमाडपोर, असर्मा, दारापुरा, डुंगरी, गोदावडी, हरंगम, कोटंबी, सार्वाणी, वंस्कूई, बालडा, भाटी करंबेली, जीताली, उमरा, बर्कल, भटलाई, कण्यासी, पार्डी झंखारी, पाथरी, करमळ, हांडोद चोकडी

ब) महाराष्ट्र - बारागाव पिंपरी, खर्डे, मांजरोड, जातोडा, मेहेरगाव, सोमठाणे, ओढा, वार, शहा, भातने जवखेडा, लामकानी, चिंचखेड, शेवडे, गोंदूर, दोडी बुद्रुक, रायपूर, भाटपुरे, वरुड (महाराष्ट्र), दीघवे, वडजाई, इंदवे, विंचूर, देवभाने, देऊर बुद्रुक, पांढुर्ली

३. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

अ. क्र.	उपकंपनीचे नाव	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	कृती-कार्य
1.	बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड	बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५	हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम
2.	बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड	बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५	स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी

च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश		
		(₹ कोटींमध्ये)
	३१ मार्च २०२२ रोजी	३१ मार्च २०२१ रोजी
मालमत्ता		
आर्थिक मालमत्ता		
रोख व रोख समकक्ष	२,८९८.६६	१,३७१.७९
रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स	२.०७	२.११
व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स)	१२१.९०	०.००
व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स)	१,०१७.११	७०९.७२
कर्जे	१,४४,२७६.२५	१,१३,०८९.९४
गुंतवणूकी	१६,३७१.८८	२०,१६९.१२
इतर आर्थिक मालमत्ता	४६४.४४	४८७.१३
एकूण आर्थिक मालमत्ता	**१,६५,१५२.२५**	**१,३५,८२९.८१**
**बिगर-आर्थिक

‘लोकसत्ता गणेशोत्सव स्पर्धे’साठी गणेश मंडळे सज्ज

स्पर्धेसाठी अर्जाचे वितरण सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : जगभरात नावलौकिक संपादन केलेल्या पुण्याच्या गणेशोत्सवामध्ये विधायक उपक्रम राबविणाऱ्या गणेश मंडळांचे कौतुक करण्यासाठी यंदाही ‘लोकसत्ता गणेशोत्सव स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुणे शहरातील सोसायटी अशा तीन विभागांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या मंडळांसाठी पस्पर्धेसाठी अर्जाचे वितरण सुरूवेश अर्जाचे वितरण सुरू करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळेही सज्ज झाली आहेत.

करोना प्रादुर्भावामुळे दोन वर्षे गणेशोत्सव साधेपणाने साजरा करावा लागला होता. विघ्नहर्त्याच्या कृपेने हे संकट दूर झाले असून आता येणाऱ्या गणेशोत्सवाची तयारी मंडळांमध्ये सुरू झाली आहे. एकीकडे ही तयारी सुरू असतानाच सार्वजनिक मंडळांचे देखावे अधिक प्रेक्षणीय व्हावेत, त्यातून देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या लाखो गणेशभक्तांचे प्रबोधन व्हावे आणि सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मंडळांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने ‘लोकसत्ता’ने दोन वर्षांच्या खंडानंतर गणेशोत्सव स्पर्धा आयोजित केली आहे. ‘पुनीत बालन ग्रुप’ प्रस्तुत ‘लोकसत्ता गणेशोत्सव स्पर्धा २०२२’चे माणिकचंद ऑक्सिरिच, वर्ल्ड वेब सोल्युशन्स आणि बढेकर ग्रुप हे सहप्रायोजक आहेत. स्पर्धा पॉवर्ड बाय क्रेझी चिझी, मांडके हिअरिंग सर्व्हिसेस, हेल्दियम, दि कॉसमॉस को-ऑप बँक लि. आणि डॉ. सागर बालवडकर, सचिव श्री खंडेराय प्रतिष्ठान शिक्षण संस्था हे आहेत.

पुणे शहर, पिंपरी-चिंचवड शहर आणि पुण्यातील सोसायट्या अशा तीन विभागांमध्ये होत असलेल्या या स्पर्धेतील विजेत्या मंडळांना भरघोस रकमेची रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. पुण्यनगरीतील सार्वजनिक मंडळांचे देखावे पाहण्यासाठी राज्यभरातून आणि परराज्यातूनही नागरिक मोठ्या संख्येने येतात. त्या दृष्टीने मंडळांचे कार्यकर्ते आपला देखावा उत्कृष्ट कसा होईल यासाठी परिश्रम घेतात. अशा उत्तमोत्तम देखावे साकारणाऱ्या मंडळांना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांबरोबरच पुण्यातील सोसायट्यांमधील मंडळे या स्पर्धेमध्ये सहभागी होऊ शकणार आहेत. गणेशोत्सवातील कार्यकर्त्यांची उमेद वाढवण्याच्या आणि कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने ही स्पर्धा होत आहे.

‘लोकसत्ता गणेशोत्सव स्पर्धा २०२२’
स्पर्धेचे गट आणि पारितोषिकांचे स्वरूप

पुणे शहर
- **प्रथम क्रमांक** – २५,००१ रुपये
- **द्वितीय क्रमांक** – १५,००० रुपये
- **तृतीय क्रमांक** – ९,९९९ रुपये
- **पर्यावरणपूरक सजावट** – ९,९९९ रुपये
- **कला दिग्दर्शक** – २,५०१ रुपये
- **संहितालेखक** – २,५०१ रुपये
- **सामाजिक जागृती** – २,५०१ रुपये
- **उत्तेजनार्थ (तीन)** – ५,००१ रुपये

पिंपरी-चिंचवड शहर
- **प्रथम क्रमांक** – २५,००१ रुपये
- **द्वितीय क्रमांक** – १५,००० रुपये
- **तृतीय क्रमांक** – ९,९९९ रुपये
- **पर्यावरणपूरक सजावट** – ९,९९९ रुपये
- **कला दिग्दर्शक** – २,५०१ रुपये
- **संहितालेखक** – २,५०१ रुपये
- **सामाजिक जागृती** – २,५०१ रुपये

सोसायटी विभाग (पुणे शहर)
- **प्रथम क्रमांक** – ९,९९९ रुपये
- **द्वितीय क्रमांक** – ७,००१ रुपये
- **तृतीय क्रमांक** – ५,००१ रुपये
- **उत्तेजनार्थ (चार)** – ३,००१ रुपये

- **पारितोषिक विजेत्या सर्व मंडळांना मानचिन्ह आणि सन्मानपत्र.**
- **स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व मंडळांना सन्मानपत्र.**

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी

■ स्पर्धेत सहभागी होण्यासाठीचा सविस्तर तपशील आणि प्रवेश अर्ज व अन्य माहितीसाठी ‘लोकसत्ता’ कार्यालयात (एक्सप्रेस हाउस, प्लॉट नं. १२०५/६ शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे- ४११००४) येथे दुपारी बारा ते सायंकाळी पाच या वेळेत संपर्क साधावा.

■ पुणे विभागातील मंडळे आणि सोसायटी विभागासाठी गिरीश टोकशिया (९८८१०९८४७५) यांच्याशी आणि पिंपरी-चिंचवड विभागासाठी रामचंद्र शेंडे (९८३३२१४४६०) यांच्याशी संपर्क साधता येईल.

पुनीत बालन ग्रुप प्रस्तुत लोकसत्ता गणेशोत्सव स्पर्धा २०२२

सहप्रायोजक : ■ माणिकचंद ऑक्सिरिच, ■ वर्ल्ड वेब सोल्युशन्स, ■ बढेकर ग्रुप

पॉवर्ड बाय : ■ क्रेझी चिझी, ■ मांडके हिअरिंग सर्व्हिसेस, ■ हेल्दियम, ■ दि कॉसमॉस को-ऑप बँक लि., ■ डॉ. सागर बालवडकर, सचिव श्री खंडेराय प्रतिष्ठान शिक्षण संस्था

राज ठाकरे आजपासून पुणे दौऱ्यावर

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आजपासून (गुरुवार) पुणे दौऱ्यावर येत आहेत. मनसेच्या शहर कार्यालयाला ते भेट देणार असून त्यांच्या हस्ते सभासद नोंदणी मोहिमेला सुरुवात केली जाणार आहे.

राज्यातील सध्याच्या एकूणच राजकीय परिस्थितीबाबत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नुकत्याच मुंबईत झालेल्या मेळाव्याच्या भाषणामधून महाविकास आघाडी आणि सध्याच्या राज्य सरकारचा चांगलाच समाचार घेतला. याशिवाय आगामी काळात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कशाप्रकारे कामे केली पाहिजेत, याबाबत देखील त्यांनी मार्गदर्शन केले होते. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांच्या उपस्थितीत पुण्यातून मनसेच्या सभासद नोंदणी मोहिमेला सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती मनसेचे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांनी दिली.

दरम्यान, मुंबईत झालेल्या भाषणातच राज यांनी पुणे दौऱ्यावर जाणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार ते गुरुवारी पुण्यात येणार असून सकाळी १० वाजता नवी पेठेतील मनसेच्या मध्यवर्ती कार्यालयाला भेट देणार आहेत. या वेळी त्यांच्या हस्ते मनसे सभासद नोंदणीच्या उपक्रमाला सुरुवात होणार आहे.

पश्चिम पुण्यासह पेठांचा पाणीपुरवठा आज बंद

उद्या कमी दाबाने पाणी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : वारजे जलकेंद्र, चांदणी चौक, गांधी भवन, वारजे, एसएनडीटी टाकी परिसर आणि स्वारगेट पाणीपुरवठा विभागाबरोबरच नवीन आणि जुने होळकर जलकेंद्र, चतुःश्रृंगी टाकी परिसरात विद्युत, पंपिंग आणि स्थापत्य विषयक तातडीची देखभाल दुरुस्तीची कामे गुरुवारी (२५ ऑगस्ट) करण्यात येणार आहेत. त्यामुळे पश्चिम पुण्याबरोबरच पेठांमधील पाणीपुरवठा गुरुवारी बंद राहणार आहे. शुक्रवारी (२६ ऑगस्ट) सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता असल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून कळविण्यात आले आहे.

पाणीपुरवठा बंद असणारा भाग पुढीलप्रमाणे-

वारजे जलकेंद्र आणि चांदणी चौक टाकी परिसर- पाषाण साठवणूक टाकी, भूगाव रस्ता परिसर, कोकाटे वस्ती, सेंटीन हिल सोसायटी, मधुबन सोसायटी, बावधन परिसर, उजवी आणि डावी भुसारी कॉलनी, चिंतामणी सोसायटी, गुरू गणेशनगर, सूरज नगर, सागर कॉलनी, भारती नगर, पूजा पार्क, सारथी शिल्प सोसाटी, शांतीवन सोसायटी, डुक्कर खिंड परिसर, शास्त्रीनगर, न्यू लक्ष्मीनगर, परमहंस नगर, बाणेर, बालेवाडी, पाषाण, सोमेश्वरवाडी, सुतारवाडी, निम्हणमळा, लम्हाण तांडा, मोहननगर, सूस रस्ता कुंभारवाडी, काकडे सिटी, होम कॉलनी, सिप्ला फाउंडेशन, रेणुकानगर, हिल व्ह्यू गार्डन, पॉप्युलर कॉलनी, वारजे माळवाडी परिसर, गोकुळनगर, अतुलनगर, भुजबळ टाऊनशिप, एकलव्य कॉलेज परिसर, रोहन गार्डन परिसर, कोथरूड क्षेत्रीय कार्यालय परिसर, श्रावणधारा झोपडपट्टी, सहजानंद, किर्लोस्कर डिझेल कंपनी, लक्ष्मीनगर झोपडपट्टी, शेरावती सोसायटी, सिद्दकला सोसायटी, हिंगणे होम कॉलनी, मिलेनियन स्कूल परिसर, कर्वेनगर गावठाण, तपोधाम परिसर, रामनगर, गोसावी वस्ती, कॅनॉल रस्ता. चाकणकर मळा, पॅनकार्ड क्लबरोड, पल्लोड फार्म, शिंदे पारखे वस्ती, विधाते वस्ती, मेडीपॉईंट रस्ता, विजयनगर, आंबेडकरनगर, दत्तनगर, कर्वेनगर गावठाण परिसर, शाहू कॉलनी गल्ली क्रमांक एक ते अकरा, वारजे जकात नाका परिसर, कर्वेनगर गल्ली क्रमांक एक ते दहा

एसएनडीटी टाकी- गोखलेनगर, शिवाजीनगर, मॉडेल कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी, कोथरूड, वडारवस्ती, स्टेट बँक कॉलनी, श्रमिक वसाहत, हॅपी कॉलनी, हनुमाननगर, मेघदूत, तेजसनगर, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंधानगर, जयभवानीनगर, रामबाग कॉलनी, वडारवाडी, सेनापती बापट रस्ता, जनवाडी, वैदूवाडी, भोसलेनगर, अशोकनगर, शिवाजी हौसिंग सोसायटी, भांडारकर रस्ता, प्रभात रस्ता, आपटे रस्ता, घोले रस्ता, सेनापती बापट रस्ता, पंचवटी, गणेशनगर, एरंडवणा, कर्वेरस्ता, विद्यापीठ परिसर, खडकी, हनुमाननगर, जनवाडी, वैदूवाडी, वडारवाडी, पोलीस लाईन, संगमवाडी.

पर्वती टाकी परिसर- गुरुवार पेठ, बुधवार पेठ, काशेवाडी, क्वार्टरगेट परिसर, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहियानगर, सोमवार पेठ, अरूण वैद्य स्टेडियम परिसर, घोरपडे पेठ, मुळा रस्ता, खडकी कॅन्टोन्मेंट परिसर, हरिगंगा सोसायटी.

चतुःश्रृंगी टाकी परिसर- औंध, बापोडी, भोईटे वस्ती, पुणे विद्यापीठ परिसर, चिखलवाडी, खडकी, आनंदपार्क, सानेवाडी, आंबेडकर वसाहत, संकल्प पार्क, सकाळनगर, चव्हाणनगर, अभिमानश्री सोसायटी, नॅशनल सिंध सोसायटी, औंध गाव परिसर.

शहराला दहा महिने पुरणाऱ्या पाण्याचा खडकवासला धरणातून विसर्ग

लोकसत्ता प्रतिनिधी

अद्यापही ८५६० क्युसेकने विसर्ग सुरू

जिल्ह्यातील २२ धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरू

पिंपळगाव जोगे, येडगाव, वडज, डिंभे, घोड, विसापूर, चिल्हेवाडी, कळमोडी, चासकमान, भामा आसखेड, आंद्रा, वडीवळे, कासारसाई, मुळशी, टेमघर, वरसगाव, पानशेत, खडकवासला, भाटघर, वीर, नाझरे आणि उजनी अशी २२ धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली असल्यामुळे या धरणांमधून कमी-अधिक प्रमाणात सध्या पाण्याचा विसर्ग सुरू आहे, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

पुणे : खडकवासला धरणातून मुठा नदीत यंदाच्या हंगामात आतापर्यंत तब्बल १४ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी सोडून देण्यात आले आहे. महानगरपालिकेकडून दरवर्षी १६ ते १७ टीएमसी पाणी वापरण्यात येते. त्यानुसार शहराला दहा महिने पुरेल एवढे पाणी आतापर्यंत नदीत सोडून देण्यात आले आहे. दरम्यान, बुधवारी दिवसभरात खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने उघडीप दिली. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत सायंकाळनंतर विसर्ग कमी करून तो ८५६० क्युसेक करण्यात आला.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चारही धरणांत मिळून २९.१५ टीएमसी म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. दिवसभरात टेमघर धरणक्षेत्रात दहा मिलिमीटर, वरसगाव आणि पानशेत धरणांच्या परिसरात अनुक्रमे आठ आणि सात मि.मी., तर खडकवासला धरणक्षेत्रात दोन मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. टेमघर धरणातून ३२० क्युसेकने, वरसगाव धरणातून ४४४० क्युसेकने, पानशेत धरणातून १९५४ क्युसेकने पाणी सोडण्यात आले. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत सायंकाळी सातनंतर ७७०४ क्युसेकने, तर रात्री नऊनंतर ८५६० क्युसेकने पाणी सोडण्यात आले. यंदाच्या हंगामात आतापर्यंत खडकवासला धरणातून मुठा नदीत १३.८९ टीएमसी पाणी सोडण्यात आले आहे, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहर व परिसराला पाणीपुरवठा करणारे पवना धरण १०० टक्के भरले असून या धरणात दिवसभरात ३२ मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. जिल्ह्यातील इतर धरणांच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर कमी झाला आहे. बहुतांशी धरणांत समाधानकारक पाणीसाठा जमा झाला आहे. जिल्ह्याच्या सीमेवरील उजनी हे धरण देखील १०० टक्के भरले आहे, असेही जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवारी श्रीक्षेत्र देहू येथे जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या शिळामंदिराचे दर्शन घेतले. या वेळी वारकऱ्यांच्या संगतीने त्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात ठेकाही धरला.

लोहमार्ग पोलिसांच्या कोठडीत तरुणाचा मृत्यू

पोलीस मारहाणीत मृत्यू झाल्याचा नातेवाईकांचा आरोप

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : चोरीच्या गुन्ह्यात लोहमार्ग पोलिसांनी अटक केलेल्या तरुणाचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. तरुणाचा मृत्यू आजारपणामुळे झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मात्र, तरुणाचा मृत्यू पोलिसांनी केलेल्या मारहाणीमुळे झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. दरम्यान, याबाबत आमदार रोहित पवार यांनी विधानसभेत मुद्दा उपस्थित केला आहे.

नागेश पवार (वय २८, रा. जामखेड, जि. अहमदनगर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. पवारला १७ ऑगस्ट रोजी चोरीच्या गुन्ह्यात पुणे लोहमार्ग पोलीसांनी अटक केली होती. पोलीस कोठडीत पवारकडे चौकशी करण्यात येत होती. दरम्यान, पवारला कोठडीत अस्वस्थ वाटू लागल्याने त्याला ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात त्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान, नातेवाईकांनी पोलिसांनी केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. ससून रुग्णालयात पवारचे नातेवाईक जमले होते.

- पुणे महानगरपालिका -
मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय
फेर-निविदा जाहिरात

पुणे Pune अद्वितीय & Unique

जाहिरात क्र.: ३/५५३, दिनांक २४/०८/२०२२. विक्री कालावधी दिनांक: २६/०८/२०२२ ते दिनांक १५/०९/२०२२, दुपारी २.०० वा.पर्यंत
स्वीकृती दिनांक: दिनांक २६/०८/२०२२ ते दिनांक १५/०९/२०२२, दुपारी ३.०० वा.पर्यंत. **निविदा उघडणे दिनांक:** दिनांक १९/०९/२०२२, दुपारी ३.०० वा.पर्यंत.

अ. क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव	पु.ग.प. रक्कम	बयाणा रक्कम रु.	एक पाकीट/ दोन पाकीट पद्धत	निविदा संच रुपये	कामाची मुदत	मनपा रजिस्ट्रेशन अट शिथिल आहे का?	कामाचा निवदा संच संपूर्ण हार्ड कॉपी/ सॉफ्ट कॉपीसोबत जोडली आहे का?	नवीन काम/ फेर टेंडर तपशील देणे	निविदाविषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक
1.	PMC/ Chief Engg (Project)/ 2022/30	येरवडा येथे तारकेश्वर पुलाचे रुंदीकरण व टी-जंक्शन विकसित करणे.	५४६१६१३६.२८	६२३०००.००	दोन पाकीट पद्धत	१७८७९.००	१२ महिने	होय	होय	फेर-टेंडर	श्री. संदीप पाटील (उप-अभियंता) ९६८९९३१२३५ श्री. रणजीत मुटकुळे (शाखा अभियंता) ९६८९९३१२६८

